निवडक



नवी दिल्ली : पुरस्कार स्वीकारल्यानंतर वैष्णवी महंत यांच्या समवेत जान्हवी बोंद्रे सोबत इतर मान्यवर.

## जान्हवी बोंद्रे यांना वूमन ऑफ सबस्टंन्स पुरस्कार २०२५' प्राप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : सिद्धकला नृत्य अकादमीतर्फे गेली अनेक दशके भरतनाट्यम्‌चे शिक्षण देऊन गोव्यातील अनेक मुलींना भरतनाट्यम् मध्ये पारंगत केलेल्या कुशल नृत्यशिक्षिका जान्हवी बोंद्रे यांना नवी दिल्ली येथील 'वूमन ऑफ सबस्टंन्स पुरस्कार २०२५' देवून गौरविण्यात आले. नामवंत अभिनेत्री वैष्णवी महंत यांच्या हस्ते आयटीसी ग्रँड,नवी दिल्ली येथे शानदार सोहळ्यात हा पुरस्कार महिला दिनी जान्हवी बोंद्रे यांना प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट भरतनाट्यम गुरू म्हणून त्यांची निवड करण्यात आली आहे. जान्हवी यांच्या अनेक विद्यार्थीनींनी अरेंगेत्रम यशस्वीपणे पार केले आहे. त्यांच्या विद्यार्थिनी राष्टीय नृत्य स्पर्धेतून चमकल्या आहेत व पारितोषिक प्राप्त ठरल्या आहेत.

## आसरो येथे उद्या वीजपुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : बीपीएस क्लब फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १२ रोजी सकाळी ९ ते संध्यकाळी ६ वाजेपर्यंत विश्वास – बी बिल्डिंगच्या समोर, आसरो – एफ बिल्डिंग, गार्डन जवळ (बीपीएस क्लब) जवळ, रामनाथ लक्ष्मीबाई हेरिटेज फेज २, वन खात्याजवळ आणि सभोवतालच्या भागात वीजपुरवठा केला जाणार नाही.

## बायंगिणी जुने गोवा येथे वीज तारांबाबत इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : बायंगिणी जुने गोवा येथे सुरियाजी चरद चंद्र पी. नावेलकर आणि इतरांना वीजपुरवठा करण्यासाठी नव्याने उभारण्यात आलेल्या ४०० केव्हीए वितरण ट्रान्सफॉर्मर केंद्र व त्याच्या संघटित वीज यंत्रणा १० पासून विद्युत भारीत करण्यात आली असून यापुढेही ती तशीच भारीत राहील. लोकांनी या वरील यंत्रणेपासून दूर राहावे त्यांना स्पर्श करू नये अन्यथा जीवितास धोका आहे.

## जुना कोंजे फिडरवर आज खंडित वीज पुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : जुना कोंजे फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने ११ रोजी सकाळी ९ ते संध्या ७ वाजेपर्यंत कोंजे आणि कारमे चपेल जवळच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे जुना कोंजे फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १२ मार्च २०२५ रोजी सकाळी ९ ते संध्या ७ वाजेपर्यंत कोंजे भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

## पिसुर्ले आयडीसी येथे वीज तारांबाबत इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : पिसुर्ले आयडीसी येथे मे. एसएमआर इंजिनियरींग प्रकल्पाला वीज पुरवठा करण्यासाठी नव्याने उभारण्यात आलेले १०० केव्हीए ट्रान्सफॉर्मर केंद्र व त्याच्या संघटित वीज यंत्रणा १२ मार्च २०२४ पासून विध्युत भारीत करण्यात आली असून यापुढेही ती तशीच भारीत राहील. लोकांनी या वरील यंत्रणेपासून दूर रहावे त्यांना स्पर्श करू नये अन्यथा जीवितास धोका आहे.

## गोवा पुनर्वसन मंडळाचे पाटो – पणजी येथे स्थलांतर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : गोवा पुनर्वसन मंडळाचे बीएसएनएल प्रशासकीय इमारत, सहावा मजला, पाटो प्लाझा, पणजी येथे स्थलांतर करण्यात आले आहे. सदर मंडळाचा फोन क्रमांक ०८३२–२४३७२५४, २४३७७३९ असा असून ईमेल: सीीलसेरसारळश्र.लो अशी आहे.

## नो पार्कींग विभाग आणि एकमार्गी रस्ता अधिसूचित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १०** : दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी माथानी साल्ढाणा प्रशासकीय प्रकल्पा समोरील एनएच–६६ रस्त्याच्या बाजुला प्रकल्पातून बाहेर जाण्याच्या गेटीपासून दोन्ही बाजुनी सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी नो पार्किंग विभाग तसेच एकमार्गी रस्ता म्हणून अधिसुचित केला आहे आणि संबंधित यंत्रणेस नो पार्किंग आणि नो एंट्रीचे सूचना फलक लावण्याचे आदेश दिले आहेत.

# कर्नाटक सरकारला म्हादई वळवण्यासाठी केंद्राच्या मंजुरीची अपेक्षा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १० :** कर्नाटक सरकारला आशा आहे की, केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय कळसा–भांडुरा म्हादई नदी वळवण प्रकल्पासाठी आवश्यक मंजुरी लवकरच देईल. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राज्याच्या २०२५–२६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात याबाबत माहिती दिली.

सिद्धरामय्या यांनी ७ मार्च रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात म्हटले की, कळसा–भांडुरा कालवा वळवण प्रकल्पांतर्गत ३.९० टीएमसी पाण्याच्या वापरास केंद्र सरकारकडून मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे काही अटींसह कंत्राट दिले असून, केंद्राची मंजुरी मिळताच प्रकल्पाचे काम सुरू होईल.

मुख्यमंत्र्यांनी अलमट्टी धरण प्रकल्पाबाबत कोणतेही ठोस आश्वासन दिले नाही. मात्र, यूकेपी ३ योजनेच्या अंतर्गत उंची वाढीमुळे बाधित होणाऱ्या क्षेत्रांचे भूसंपादन व भरपाई वाटपासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्य सरकारने कृष्णा, कावेरी आणि इतर नदी खोऱ्यातील प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. २०२३–२४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात अप्पर भद्रा प्रकल्पासाठी ५,३०० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असले तरी, अद्याप ते वितरित करण्यात आलेले नाही.

या आठवड्यात सादर झालेल्या राज्य अर्थसंकल्पात कळसा–भांडुरा प्रकल्पासाठी कोणतीही अतिरिक्त तरतूद नसल्याने उत्तर कर्नाटकातील जनतेत नाराजी



आहे. केंद्र सरकारकडून मंजुरी मिळण्यात होत असलेल्या विलंबामुळे प्रकल्पाची अंमलबजावणी थांबली असल्याचे कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.

सर्व कन्नड संघटनांचे अध्यक्ष व प्रमुख कार्यकर्त्यांनी केंद्राच्या विलंबामुळे प्रकल्प रखडल्याचे निदर्शनास आणले. पर्यावरणीय आणि वन्यजीव संरक्षणासंबंधी केंद्र सरकारच्या मंजुरीशिवाय काम पुढे जाऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले.

गोवा सरकारने म्हादई वळवण प्रकल्पावर आक्षेप घेतला असून, हा मुद्दा सध्या सर्वोच्च न्यायालयात आहे. यामुळे पर्यावरण मंत्रालयानेही वन मंजुरीबाबत निर्णय पुढे ढकलला आहे. कर्नाटक सरकारने या प्रकल्पाला गती मिळावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी निवेदने सादर केली आहेत. मात्र, अद्याप अंतिम मंजुरी मिळालेली नाही. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये केंद्र आणि राज्य अधिकाऱ्यांचा प्रतिसाद संथ असल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढली आहे. वारंवार विनंत्या करूनही प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांसाठी प्रशासनाकडून समाधानकारक हालचाल होत नसल्याची टीका कार्यकर्त्यांनी केली आहे.

# सांगे पीएचसीमध्ये १०८ रुग्णवाहिका नाही

■ टीम दैनिक हेराल्ड

**सांगे, दि. १०** : सांगे येथील सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्रात (पीएचसी) १०८ रुग्णवाहिका सेवा अनुपलब्ध असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. रुग्णवाहिकेच्या चालकाची नियुक्ती न झाल्यामुळे ही सेवा मागील एका महिन्याहून अधिक काळ ठप्प आहे.

या परिस्थितीमुळे आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी रुग्णांना सुमारे २६ किलोमीटर अंतरावर असलेल्या नेत्रावली येथून रुग्णवाहिका मागवावी लागत आहे. विलंबामुळे गंभीर रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत विलंब घातक ठरू शकतो, अशी चिंता स्थानिक रहिवासी मिल्टन फर्नांडिस यांनी व्यक्त केली.




स्थानिक नागरिकांनी ईएमआरआय सेवांना तातडीने चालकाची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून आरोग्य केंद्रातील आपत्कालीन वैद्यकीय सेवा सुरळीत सुरू राहतील. त्यांनी सार्वजनिक आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही सेवा तातडीने पूर्ववत करण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे.

या मुद्द्यावर सांगेचे आमदार सुभाष फळ देसाई यांनी प्रतिक्रिया देत सांगितले की, त्यांनी परिस्थितीची गंभीर दखल घेतली असून संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे. त्यांनी स्थानिक नागरिकांना आश्वासन दिले आहे की, या समस्येचे त्वरित निराकरण करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील.

आमदार फळदेसाई यांनी स्पष्ट केले की, रुग्णवाहिका बंद असल्याची माहिती त्यांना पूर्वी देण्यात आलेली नव्हती, ज्यामुळे स्थानिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून रुग्णवाहिका सेवा पूर्ववत करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# उसगावात पाण्यासाठी घागर मोर्चा

## पाणीटंचाईचा निषेध : अधिकाऱ्यांना विचारला जाब

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १०** : उसगाव येथील महिलांनी सोमवारी दाग फोंडा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर घागर मोर्चा काढला आणि बऱ्याच काळापासून सुरू असलेल्या पाणीटंचाईचा निषेध करीत अधिकाऱ्यांना जाब विचारला काँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस असलेल्या पंच सदस्या मनीषा उसगावकर यांच्या नेतृत्वाखाली स्थानिकांनी दाग फोंडा येथे सहाय्यक अभियंता काशिनाथ सराफ यांना घेराव घातला. मनीषा उसगावकर यांनी सराफ यांना सांगितले की, यापूर्वी त्यांनी पाणीटंचाईच्या तक्रारीसाठी चार वेळा पीडब्ल्यूडी कार्यालयात भेट दिली होती आणि ही पन्नास वेळा आहे जेव्हा ते रिकामी भांडी मोर्चा घेऊन आले आहेत. स्थानिकांनी इशारा दिला की, जर आठ



दिवसांत त्यांना सामान्य पाणीपुरवठा झाला नाही. तर स्थानिक लोक सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना घेराव घालतील. त्यांनी सहाय्यक अभियंत्यांना किमान दोन तास पाणीपुरवठा करण्याची विनंती केली जेणेकरून ग्रामस्थ त्यांच्या गरजेनुसार पुरेसे पाणी त्यांच्या भांड्यांमध्ये भरू शकतील. त्यांनी सांगितले की, त्यांचा वॉर्ड उतारावर असल्यामुळे मारवासडा आणि वोडकाडे येथील ग्रामस्थांना पाणी मिळत नाही. एका ग्रामस्थाने सांगितले की त्यांना एक थेंबही पाणी मिळाले नाही आणि ते शेजाऱ्यांवर अवलंबून आहेत.एई काशिनाथ सराफ यांनी पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी परिसराची आणि त्यांच्या नळजोडण्यांची पाहणी करण्याचे आश्वासन दिले.

# साळ येथील गडेत्सवासाठी वाहतूक, वाहनतळाचे नियोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १०** : साळ मधील प्रसिद्ध गडेत्सव शुक्रवार दि. १४ मार्च ते रविवार दि. १६ रोजीपर्यंत तीन रात्री हा उत्सव साजरा होणार आहे. श्री महादेव भूमिका देवस्थान समिती, गडे सदस्य आणि साळ मधील विविध संस्थां व क्लबने सर्व तयारी पूर्ण करीत असून देवस्थान अध्यक्ष कालिदास राऊत व सचिव विशाल परब व बाकी सदस्य व महाजन, ग्रामस्थ हे स्वतः लक्ष देऊन कामकाज पूर्ण करून घेत आहेत.

या बैठकीस श्री महादेव भूमिका देवस्थान समिती अध्यक्ष कालिदास राऊत , सचिव विशाल परब व इतर मान्यवर उपस्थित होते. शुक्रवारी या



साळ : गडेत्सवाच्या तयारीसाठी जेसीबीच्या साहाय्याने आजूबाजुच्या परिसरातील साफसफाई करताना. सोबत देवस्थान अध्यक्ष कालिदास राऊत.

उत्सवाला सुरुवात होणार असून प्रत्येक रात्री येणाऱ्या भाविकांची वाहने साळमध्ये दाखल होतात. येणाऱ्या भाविकांना व नंतर गडा आणण्यासाठी धावणाऱ्या भाविकांना कोणताही अडथळा होऊ नये म्हणून येणाऱ्या वाहनधारकांनी आपापली वाहने कोणकोणत्या वाहनतळावर उभी करावी त्यावर चर्चा करण्यात आली .धुमासे मार्गे येणाऱ्या वाहनां साठी खास आदेश की दुचाकी वाहने दुर्गात या जमिनी क्षेत्रात तसेच भूमिका मंदिराच्या पाठीमागून राखण्याच्या होळी जवळ तसेच भूमिका मंदिराच्या उजव्या बाजूने सौंदर्यकरण्यासाठी बसवलेल्या फरशीवर दुचाकी, तिनचाकी व चारचाकी वाहनथांबा असेल. कासारपाल मार्गे येणाऱ्या वाहनधारकांनी नंदिश नाईक साळगावकर यांच्या घराशेजारी व जोशी (मधलावाडा) यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेवर तसेच पांडुरंग गवस व संतोष राऊत यांच्या घराशेजारी वाहने उभी करावीत. दोडामार्ग मार्गे येणारी सर्व वाहने यशवंत राऊत व शैलेश राऊत यांच्या घराशेजारील मोकळ्या जागेवर उभी करावीत. तसेच सर्व प्रकारची वाहने सरकारी हायस्कूलच्या मैदानावर उभी करावीत असे देवस्थान समितीचे अध्यक्ष कालिदास राऊत यांनी सांगितले.

विशेष करून धुमासे व कासारपाल मार्गे येणाऱ्या भाविकांनी रात्री १० नंतर साळमध्ये प्रवेश करू नये, रात्री १० नंतर धुमासे येथील श्री सातेरी पुरूमार मंदिराजवळ तर कासारपाल किंवा वडावल येथील श्री सिद्धेश्वर देवस्थान शेजारी हे मार्ग वाहतुकीसाठी बंद केले जातील फक्त दोडामार्ग खोलपेमार्गे येता येईल व हा मार्ग चालू असेल पण तिन्ही मार्ग पहाटे ५नंतरच खुले केले जाईल ही सूचना भाविकानी लक्षात ठेवावी. मद्यपान वाहतुकीस पूर्णपणे बंदी असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये व उत्सवाचा आनंद ,अनुभव घेत उत्सवासाठी योग्य ते सहकार्य करावे आणि आपला प्रवास सुखकर व्हावा यासाठी प्रयत्नशील रहावे ही उत्सव आठवणीत राहावा यासाठी वाहनधारकांनी प्रत्येक रात्री कार्यक्रम संपल्या नंतर परतीचा पहाटे ५ वाजता प्रवास करावा असे देवस्थानचे अध्यक्ष कालिदास राऊत व सचिव विशाल परब याने आवाहन केले आहे.

# लोबो यांच्या मालमत्तेवर बेकायदेशीर विकास

■ टीम दैनिक हेराल्ड

**हणजूण, दि. १०** : हणजूण – वागातोर रहिवाशांनी कळंगुटचे आमदार मायकल लोबो यांच्या मालकीच्या समुद्रकिनाऱ्यालगतच्या वाळूच्या ढिगाऱ्यांचा आणि वनस्पतींचा कथित नाश केल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. ग्रामस्थांनी या जागेवर विकासासाठी दिलेले कोणतेही परवाने तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

वागातोर समुद्रकिनाऱ्यावर असलेला वादग्रस्त भाग नो डेव्हलपमेंट झोन (एनडीझेड) मध्ये येतो आणि समुद्राच्या हाय टाइड लाइन (एचटीएल) पासून फक्त ४४ मीटर अंतरावर आहे. नियमांनुसार, या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात कोणतेही कायमस्वरूपी बांधकाम करण्यास परवानगी नाही.

तथापि, वाळूमध्ये खोल टायर ट्रॅक आणि मालमत्तेच्या एका टोकाला जेसीबीची उपस्थिती सूचित करते की या भागात जड यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. वाळू आणि चुनखडीचे ढिगारे, तसेच त्या ठिकाणी कामगार, संभाव्य बांधकाम क्रियाकलापांचे संकेत देत होते.

स्थानिक रहिवासी रवी हरमलकर यांनी आपली चिंता व्यक्त केली आणि सांगितले की, वाळूच्या ढिगाऱ्यांचे आणि वनस्पतींचे आधीच मोठे नुकसान झाले आहे. त्यांनी आठवण करून दिली की हा परिसर ऐतिहासिकदृष्ट्या स्थानिक लोक समुद्रकिनाऱ्याला भेट देताना पिकनिक आणि विश्रांतीसाठी वापरत असत. याव्यतिरिक्त, त्यांनी या जागेचे पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले, कारण ते कासवांसाठी घरटे होते.

मी गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी (जीसीझेडएम)ला येथे बांधकामासाठी कोणतीही परवानगी देऊ नये अशी विनंती करतो. जर अशा कोणत्याही परवानग्या आधीच दिल्या गेल्या असतील तर त्या ताबडतोब रद्द कराव्यात, असे हरमलकर म्हणाले.

त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की या मालमत्तेला योग्य प्रवेश नाही आणि स्थानिक झोपडी मालकांनीही त्याच्या नैसर्गिक सौंदर्याचे रक्षण करण्यासाठी स्वेच्छेने या भागात परवानग्या घेण्याचे टाळले आहे.

आणखी एक संबंधित रहिवासी, पार्वती नागवेंकर यांनी गावकऱ्यांना समुद्रकिनारे आणि किनारी जमिनीचा नाश रोखण्यासाठी कारवाई करण्याचे आवाहन केले.

जर पाणवठ्याजवळ बांधकामांना परवानगी नसेल, तर येथे परवानगी कशी देण्यात आली? जरी ते तात्पुरत्या बांधकामांसाठी असले तरी, ते कायमस्वरूपी बांधकामात रूपांतरित होण्याचा धोका नेहमीच असतो, असे त्या म्हणाल्या.

त्यांनी जागेवर सापडलेल्या साहित्याबद्दलही शंका उपस्थित केली आणि असा युक्तिवाद केला की तात्पुरत्या बांधकामे बांबू आणि लाकूड यासारख्या पर्यावरणपूरक साहित्यापासून बनवली पाहिजेत.

कार्यकर्ते डेसमंड अल्वारेस यांनी मुख्य सचिव, जीसीझेडएमए आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांकडे वाळूच्या ढिगाऱ्यांचे बेकायदेशीर सपाटीकरण आणि वनस्पती नष्ट करण्याबाबत औपचारिक तक्रार दाखल केली आहे.

हणजूण गावातील सर्व्हे क्रमांक ३५४/१ मध्ये वागातोर समुद्रकिनाऱ्यावर जेसीबी वापरून वाळूच्या ढिगाऱ्यांचे आणि समुद्रकिनाऱ्यावरील वनस्पतींचे बेकायदेशीर नाश दिसून आले. स्थानिक आमदारांशिवाय इतर कोणीही नसून त्यांनी केलेले नुकसान पाहून दुःख होत आहे, असा आरोप अल्वारेस यांनी त्यांच्या तक्रारीत केला आहे. त्यांनी पुढे असा दावा केला की सुमारे ४० ट्रक भरलेले साहित्य हणजूण येथील ओझरांत येथील रायथ क्लबजवळ काढून टाकण्यात आले आहे.

एनडीझेड परिसरात कोणत्याही व्यावसायिक क्रियाकलापांना परवानगी देऊ नये. आम्हाला आशा आहे की हा नाश थांबवण्यासाठी आणि समुद्रकिनाऱ्याची नैसर्गिक परिसंस्था पुनर्संचयित करण्यासाठी त्वरित कारवाई केली जाईल, असे ते पुढे म्हणाले.

शनिवारी, एका सोशल मीडिया कॉलद्वारे रहिवाशांना वागातोर समुद्रकिनाऱ्याच्या नाशाच्या निषेधार्थ एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले.

तथापि, रविवारी फक्त १० ते १५ लोक घटनास्थळी आले. कमी संख्येने लोक उपस्थित असले तरी, परिसरातील कोणत्याही अनधिकृत बांधकाम किंवा पर्यावरणीय नुकसानाविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या मागणीवर स्थानिक ठाम आहेत.

# आगोंद येथे बँकेच्या युपीएस कक्षाला आग लागून नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १०** : आगोंद पंचायत इमारतीतील एका बँकेच्या युपीएस कक्षाला आग लागली असल्याचे बँक उघडल्यावर आज सकाळी स्पष्ट झाले. या आग दुर्घटनेत युपीएस कक्षाचे नुकसान झाले असल्याचे शाखा प्रबंधक राहुल कुमार याने सांगितले.

शनिवार व काल रविवार असे गेले दोन दिवस आगोंद पंचायत इमारतीत असलेली एका राष्ट्रीयकृत बँकेची शाखा सुट्टी असल्यामुळे बंद होती. आज रोजी सकाळी ही बँक उघडल्यावर एक खोलीतून दुर्गंधीचा वास आल्यावर आग लागल्याचे स्पष्ट झाले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक सरपंच नीलेश पागी, आगोंद पोलिस घटनास्थळी पोहचले. कक्षातील आग यापूर्वीच विझलेली असल्यामुळे अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले



आगोंद : पंचायत इमारतीतील बाकीच्या युपीएस कक्षाला लागलेल्या आगीचे निरिक्षण करताना सरपंच नीलेश पागी, राहुल कुमार व पोलिस.

नाही. या बँकेला लागूनच पंचायत कार्यालय व आगोंद वीज केंद्राचे कार्यालय आहे.

या बँकेचे सर्व कागदी दस्तावेज, रोख, अन्य सामान सुरक्षीत आहे. युपीएस कक्षात तांत्रिक कारणास्तव थंड रहाण्यासाठी येथील एसी सदैव चालू ठेवावा लागत असतो. शॉर्ट सर्किटमुळे एसीला आग लागून ही आग दुर्घटना झाली असण्याची शक्यता शाखाप्रमुख राहुल कुमार यांनी व्यक्त केली.

यासंदर्भात सरपंच नीलेश पागी म्हणाले की, या पंचायत क्षेत्रातील विविध भागात सतत विजेचा दाब कमी–जास्त होत असतो त्यामुळे वीजचोरी उपकरणातील बिघाड होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून येत असतात त्यामुळेच ही आग दुर्घटना झाली असावी. आपण या प्रश्नावर संबंधिताशी बोलणी करून तोडगा काढणार.